
CMYK



भारतरत्न, राष्ट्रपिता **महात्मा गांधी** यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन..!

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...


# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

माजी पंतप्रधान **लाल बहादुर शास्त्री** यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन..!



धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३३६ वा | सोमवार दि. २ ऑक्टोबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६


## न्यूज कॉलम

### तरुणावर हल्ला; चौघांवर गुन्हा

**धुळे ।** मागील भांडणाची कुरापत काढून एकावर हल्ला केल्याप्रकरणी चौघांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. शहरातील बारा पत्थर परिसरात २८ सप्टेंबरला रात्री साडेदहाच्या सुमारास ही घटना घडली. चंद्रकांत रतिलाल सोनवणे (वय ३०, रा. जिरेकरनगर, चक्करबर्डी) याच्या तक्रारीनुसार अमित ऊर्फ बंटी संजय गावडे, अक्षय राजेंद्र गावडे, अमोल राजेंद्र गावडे व रोहित राजेंद्र गावडे (सर्व रा. धुळे) यांनी चंद्रकांत याला मागील भांडणातून हाताबुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ केली. तसेच पाठीवर चाकूने वार करत जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

### शेतातून कांद्याच्या ८० गोणी लंपास

**धुळे ।** म्हसदी प्र. पिंपळनेर (ता. साक्री) शिवारातील शेतामधील शेडमधून चोरट्यांनी कांद्याच्या ८० गोणी लंपास केल्या. त्यांची किंमत ४० हजार आहे. ही घटना २१ सप्टेंबरला मध्यरात्रीनंतर घडली. याबाबत शेतमालक दीपक भारुडे (रा. सामोडे, ता. साक्री) यांच्या तक्रारीनुसार पिंपळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला.

# “वाघनखं शिवाजी महाराजांची आहेत की शिवकालीन?”

## आदित्य ठाकरेंनी उपस्थित केला मुद्दा : सरकारने खुलासा करण्याची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखं महाराष्ट्रात आणली जात आहेत. मात्र वाघनखांवरुन आदित्य ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. महाराष्ट्रात येत असलेली वाघनखं शिवाजी महाराजांनी वापरलेली आहेत की शिवकालीन आहेत? याचा खुलासा सरकारने करावा, अशी मागणी त्यांनी केली.

आदित्य ठाकरे म्हणाले की, इंग्लंडहून छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखं येत आहेत. परंतु ही वाघनखं कायमस्वरुपी आपल्याकडे राहणार आहेत का? याबाबत प्रश्नच आहे. कारण ती वाघनखं केवळ तीन वर्षांसाठी आपल्याकडे राहतील, असंही जीआरमध्ये म्हटलं. मुळात ती शिवकालीन आहेत का? असा प्रश्न आदित्यंनी उपस्थित केला आहे. मुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष आणि इतर मंत्र्यांच्या विदेश दौऱ्याबद्दल आदित्य ठाकरेंनी पत्रकार परिषदेतून टीकास्र सोडलं. ते म्हणाले की, आम्ही प्रश्न विचारल्यानंतर ३० मिनिटांत मंत्रालयातून दौरा रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. आमच्या ट्विटनंतर दौरा रद्द करावा लागला, जनतेचा पैसा आम्ही वाचवला आहे. ये डर अच्छा हैं.. उदय समंतांच्या दौऱ्याबद्दल आदित्य ठाकरे म्हणाले, उद्योगमंत्र्यांचा हा तिसरा दौरा आहे. राऊंड टेबल कॉन्फरन्सला जातायत. परंतु कोणाला भेटणार कोणत्या कंपन्या येणार याबाबत काहीच स्पष्टता नाही. दाओसला जाऊन उद्योगमंत्री करणार काय ? चार महिने आधी जाऊन काय पाहणी करणार? जनेतच्या पैशाने तुम्ही का जाताय, स्वतःच्या पैशावर का जात नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ''जपान दौऱ्याचा आणखी एक जीआर निघाला होतं. उपमुख्यमंत्री यांना टोकिओमध्ये बोलवलं होतं. या दौऱ्याचा खर्च एमआयडीसीला उचलायचा होतं. मग उद्योगमंत्री का नव्हते गेले? या दौऱ्यात नेमकं काय झालं? उपसभापती महोदया या परदेशात ५० लोकांना घेऊन गेल्या.. काय अभ्यास केला?'' हे मुद्दे उपस्थित करुन त्यांनी सरकारच्या विदेश दौऱ्यावर संशय व्यक्त केला.



### निवडणुका जवळ आल्याने वाघनखांची कल्पना :राऊत

संजय राऊत म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांची खरी वाघनखं शिवसेना आहे. गेल्या ५०-५५ वर्षे या वाघनखांनी महाराष्ट्रावर येणाऱ्या प्रत्येक आक्रमणाचा कोथळा काढलेला आहे. वाघनखांवरती वाद सुरू आहे, पण आम्हाला वाद घालायचा नाही. काल आदित्य ठाकरे यांनी त्यावरती भाष्य केले आहे. पण निवडणुका जवळ आल्या की अशा प्रकारच्या कल्पना डोक्यात येतात, असे राऊत म्हणाले.

### आदित्य ठाकरे आता हास्यास्पद नेते होत आहेत : सुधीर मुनगंटीवार

ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांना भाजप नेते आणि मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी टोला लगावला आहे. आदित्य ठाकरे आता हास्यास्पद नेते होत आहेत, असं मुनगंटीवार म्हणाले आहेत. माझ्या ट्विटनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विदेश दौरा रद्द केला असं आदित्य ठाकरे म्हणाले होते. यावरुन मुनगंटीवार यांनी हा निशाणा साधला. सुधीर मुनगंटीवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, 'आदित्य ठाकरे आता वरचेवर हास्यास्पद नेते होऊ लागले आहेत. कारण, एखाद्याच्या ट्विटवरुन मुख्यमंत्र्यांचा दौरा रद्द होऊ शकत नाही. आदित्य यांना त्यांच्या ट्विटमुळे हा दौरा रद्द झाल्याचं वाटत असेल तर ते हास्यास्पद आहे. मुख्यमंत्र्यांचा परदेश दौरा रद्द होण्यामागचं कारण वेगळं आहे.'

### वाघ नखे ग्रँट डफ नावाच्या इतिहासकाराला भेट

इंद्रजित सावंत पुढे म्हणाले, इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावच्या पराभवानंतर सातारा छत्रपतींच्या गादीवर प्रतापसिंह महाराज यांना बसवलं होतं. त्या महाराजांनी ग्रँट डफ नावाच्या इतिहासकाराला ज्यांनी मराठ्यांचा इतिहास लिहिला, जो साताऱ्याचा रेसिडेंट सुद्धा होता आणि प्रतापसिंह महाराजांशी त्याची चांगली दोस्ती होती. त्यांना भेट म्हणून वाघनखं दिली होती. ती वाघनखं व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममध्ये ग्रँट डफ यांचा वंशज अँड्रियन ग्रँट डफ यांना तिथे दिसली असून तशी स्पष्ट नोंद म्युझियमच्या कॅटलॉगमध्ये उपलब्ध आहेत. त्या वाघ नखाच्या लेबलवर देखील उल्लेख असून संग्रहालयाच्या कॅटलॉगमध्ये देखील ती वाघ नखे ही छत्रपती शिवाजी महाराजांचे अस्सल वाघ नखे असल्याची अशी कोणतीही नोंद नाही.

# आरक्षणप्रश्नी आदिवासी समाज आक्रमक ; रास्ता रोको आंदोलन



**नाशिक । प्रतिनिधी**

आदिवासी जमातीत धनगर जातीचा समावेश करू नये, आदिवासींच्या धनगरांना लागू केलेल्या सवलती बंद करा आदीसह इतर मागण्यासाठी आदिवासी समाज आक्रमक झाला आहे. नाशिकसह राज्यभर रास्ता रोको आंदोलन केले. त्र्यंबकेश्वरसह इगतपुरीजवळ घोटी टोलनाक्यावर मोठ्या संख्येने नाशिक जिल्ह्यातील सर्व समाजबांधव एकत्रित आले असून रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे आरक्षणप्रश्नी आदिवासी समाज आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे.

मराठा आंदोलन पेटल्यानंतर धनगर समाजानेही आंदोलनाचे हत्यार उपसत आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी केली. या मागणीवरून नाशिक जिल्ह्यात आदिवासी समाज आक्रमक झाला आहे. धनगर समाजाला आरक्षण देण्यास आमचा विरोध नाही, मात्र आदिवासींमधून आरक्षण देऊ नये, अशी मागणी होत आहे. त्यामुळे आदिवासी संघटनांच्या बैठका होत असून दोन दिवसांपूर्वी दिंडोरीसह त्र्यंबकेश्वर तालुक्यात विराट मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर आज आदिवासी संघटना, आदिवासी विकास परिषद आदींच्या माध्यमातून रास्ता रोको आंदोलन छेडण्यात आले आहे. त्र्यंबकेश्वर शहर आणि घोटी येथील टोलनाक्याजवळ आदिवासी बांधवानी एकत्र येत उलगुलानच्या घोषणा देता सरकारवर धारेवर धरले आहे. दरम्यान आदिवासी विकास परिषदेचे लकी जाधव म्हणाले की, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स यांनी धनगर व आदिवासी जमातीचा सर्वेक्षण करून शासनाला अहवाल सादर केला आहे. तो शासनाने जाहीर करावा, पेसा कायद्याची छेडछाड करू नये, उलट पेसा कायदा कडक करावा, शिरपूर- सांगवी येथील दंगलीत २०० चे आसपास आदिवासींवर खोटे गुन्हे दाखल झाले, ते मागे घ्यावे, कंत्राटी भरती रद्द करा, सटाणा येथील आंदोलनातील आदिवासींवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावे, आदी प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.आरक्षणप्रश्नी आदिवासी समाज आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे.

# शहादा दंगलप्रकरणी १६० जणांविरुद्ध दंगलीचा गुन्हा

**शहादा । प्रतिनिधी**

शहरातील कुकडेल भवानी चौक परिसरात किरकोळ कारणावरून उसळलेल्या दंगलीनंतर पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून १६० जणांविरुद्ध दंगलीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आतापर्यंत ३२ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेतील संशयीत समाज कंटकांची धरपकड पोलिसांकडून सुरू करण्यात आली आहे. दरम्यान दंगलप्रकरणी शहादा पोलीसात तीन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. संशयीतांना न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

शहरातील कुकडेल भवानी चौक परिसरात काल किरकोळ वादातून दोन गटात दंगल उसळली होती. यात तुफान दगडफेक करण्यात आली होती. यात वाहने, घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून काही जण गंभीर जखमी झाले आहेत. शहरातील वातावरण चिघळू नये यासाठी पोलिसांतर्फे त्वरित यंत्रणा हलवीत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आहे. रात्री उशिरा पावतो दगडफेकीतील घटनेतील संशयितना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे तर घटनेतील अनेक संशयीतांचा पोलीस शोध घेत आहेत. या प्रकरणी शहादा पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात हफीजोमुद्दिन बद्रुद्दिन अन्सारी रा. भवानी चौक यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ईद मिलादची मिरवणूक जात असताना भवानी चौकात मिरवणुकीतील व्यक्तींनी आम्हाला शिवीगाळ केली असा संशय घेत भवानी चौक परिसरात उभे असणार्या काही जणांनी मिरवणुकीवर दगडफेक केली. या दगडफेकीत पाच जण जखमी झाले आहेत त्यांच्या फिर्यादीनुसार संशयित कल्पेश भोई, गणेश ठाकरे, धनराज पाडवी व इतर ४० ते ५० संशयित इसमांविरुद्ध भादंवि कलम ३०७, ३२३, १२०, १४३, १४७, १४८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेतील १२ पुरुष व एक महिला असे १३ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### गावठी दारूसाठा; मुद्देमाल जप्त

**धुळे ।** मालनगाव (ता. साक्री) शिवारात गावठी दारूसाठ्यांवर साक्री विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी साजन सोनवणे यांनी पथकासह कारवाई केली. मालनगाव शिवारात कान नदीपात्रात एक किलोमीटरचा परिसर त्यांनी पिंजून काढला. याकामी तीन पथके तयार केली. गावठी दारूचे ७० ड्रम, रसायने, बांबू, नरसाळे, पत्री टाक्या आदी दोन लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींच्या विरोधात महाराष्ट्र दारुबंदी कायद्याप्रमाणे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याकामी तीन पथके तयार केली होती.

# ‘सफरचंद’ नाटकाचा धुळ्यात ९ ऑक्टोबरला प्रयोग

**धुळे । प्रतिनिधी**



काश्मीरमधील कथानक असलेल्या ‘सफरचंद’ या नाटकाचा अनोखा प्रयोग धुळ्यात ९ ऑक्टोबरला हिरे भवनात आगळ्यावेगळ्या दुहेरी आणि फिरत्या रंगमंचावर सादर होणार आहे. ‘माझ्या नवऱ्याची बायको’ या प्रसिद्ध टीव्ही मालिकेतील अभिनेत्री शर्मिला शिंदे या नाटकात प्रमुख भूमिकेत आहेत.

जम्मू-काश्मीरमधील झेलम नदी आणि स्नो फॉल या नाटकाच्या माध्यमातून धुळेकरांना अनुभवायला मिळणार आहे. नाटकाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा आणि देशप्रेमाचा संदेश दिला असून, कोणत्याही जाती-धर्माच्या किंवा पक्ष-संघटनेच्या बाजुने झुकणारे हे नाटक नसल्याचा दावा कलावंतांनी धुळ्यात झालेल्या पत्रकार परिषदेत केला. धुळेकर रसिक नाट्यप्रेमिंना निखळ नाटकाचा आनंद देणारे हे नाटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. धुळ्यामध्ये मोठी व्यावसायिक नाटके येतच नाहीत अशी रसिक प्रेक्षकांची नेहमीच तक्रार असते. ही तक्रार रायजिरोने कंपनीने ओळखून ती मोडीस काढावी व धुळ्यात या नाटकापासून मोठी नाटकं धुळ्यात यावी यासाठी कोणतेही शुल्क न घेता धुळेकरांसाठी उपलब्ध करुन दिले आहे. रंगमंचाचा पडदा उघडताच डोळे दिपविणारे नेपथ्य आणि मनाला भिडणारे नाटकाचे सादरीकरण, म्हणजे ‘सफरचंद’ हे मराठी रंगभूमीवर नुकतेच पदार्पित झालेले नाटक आहे. काश्मीर खोर्यात नियंत्रण रेषेजवळ वसलेल्या ‘खानपुरा’ या गावात घडणारे हे नाट्य. हा केवळ नाट्यप्रयोग नाही, तर हृदयाला भिडणारी आणि अंतर्बाह्य हलवणारी तरुणांची एक कहाणी आहे. मोहम्मद, श्यामलाल, झेलम आणि अन्वर यांची ही कहाणी आहे. रायजिरो नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेड, धुळेतर्फे खास धुळेकर रसिकांसाठी नि:शुल्क ‘सफरचंद’ हे नाटक आयोजित करण्यात आले आहे. रायजिरो नेटवर्क्स ही धुळे शहरातील बँकिंग क्षेत्रात काम करणारी नामांकित कंपनी आहे. या कंपनीतर्फे महाराष्ट्रासह इतर राज्यातही स्टेट बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ इंडिया यांचे ग्राहक सेवा केंद्र (सीएसपी सेंटर) देण्यात येते. कंपनीचे आतापर्यंत दोन हजाराहून अधिक सीएसपी सेंटर आहेत. या माध्यमातून अनेकांना रोजगार मिळालेला आहे. या सोबतच कंपनीचे एक ॲप ज्याचे नाव ‘फायदा पे’ आहे, ते लाँच झालेले आहे. या ॲपद्वारे बँक अकाऊंट उघडणे, लोन, इन्शुरन्स, क्रेडीट कार्ड अशा सेवा मिळवता येतात किंवा देता येतात.

**नाटकाची श्रेय नामावली**

मराठी रुपांतरः मुग्धा गोडबोले दिग्दर्शकः राजेश जोशी कलाकारः शंतनू मोघे, प्रमोद शेलार, शर्मिला शिंदे नेपथ्यः संदेश बेंद्रे, निर्मातेः भरत नारायणदास ठक्कर, प्रविण भोसले, अजय कासुर्डे विशेष आभार - मीनाक्षी सुधीर निंबाळकर

# आप्तस्वकीयांकडून अल्पवयीन मुलींवर अत्याचार

### ३ संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल

**धुळे । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलींवर साक्री व शिरपूर येथे अत्याचार केल्याच्या संशयावरून तीन संशयितांविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वेगवेगळ्या दिवशी दोनदा अत्याचार केल्यानंतर संशयितांनी मुलींना पळवून नेण्याचाही प्रयत्न केला.

पीडित मुली एकमेकांच्या नातलग असून, एकाच वस्तीत राहतात. संशयित त्यांचे नातलग असल्याचे कळते पीडित मुलीच्या आईने शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. ३० ऑगस्टला इंधवेहट्टी (ता. साक्री) येथे देवाची जत्रा असल्याने मुलगी व तिची आतेबहीण तेथे गेले होते. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी (ता. १५) मुलींच्या गावाजवळ देवाच्या कार्यक्रमासाठी सर्व मंडळी गेली होती. पीडित मुली व त्यांच्यासोबत अन्य एक नातलग मुलगी अशा तिन्ही घरी होत्या. रात्री बाराला संशयित दादू ठेलारी, तानू ठेलारी व भटू तांबे (सर्व रा. सतारे) दुचाकीने त्यांच्या वस्तीत पोचले.त्यांनी तिन्ही मुलींवर अत्याचार केला.

# धुळ्यात स्वच्छ भारत अभियानांतर्गत ‘एक तारीख एक तास’ स्वच्छता मोहिम संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत तसेच महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून आज धुळे शहर आणि ग्रामीण भागात एक तारीख, एक तास स्वच्छता मोहिम संपन्न झाली.

या स्वच्छता मोहिमेचा आज पांझरा नदी परिसरात सांगता समारोप संपन्न झाला. यावेळी खासदार डॉ.सुभाष भामरे, महापौर प्रतिभाताई चौधरी, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, महापालिका आयुक्ता अमिता दगडे-पाटील, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त विजय सनेर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, जयश्री अहिरराव यांच्यासह नगरसेवक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी खासदार डॉ.भामरे म्हणाले की, २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती आहे आणि त्यांना खऱ्या अर्थाने आदरांजली व्यक्त करण्यासाठी आपण सर्वांनी आपला गाव, आपले शहर स्वच्छ ठेवले पाहिजे. स्वच्छता आपल्या सर्वांच्या जीवनातील महत्वाची गोष्ट आहे. स्वच्छता आपल्या आयुष्यात समृद्धी आणते. आरोग्य आणि परिसराची स्वच्छता यांचा दृढ संबंध आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यापासून ते अनेक थोर राष्ट्र पुरूष साधू-संतानीही स्वच्छतेबाबत आपल्याला धडे घालून दिले आहेत. तसेच कोणतीही मोहिम, चळवळ यशस्वी करायची असेल तर त्यात जनतेचा सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आज येथे प्रशासन, सामाजिक संघटना तसेच युवामंचाने अत्यंत चांगले काम केल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच स्वच्छता ही अभियानापुरतीच मर्यादित न राहता प्रत्येक नागरिकांनी आपला प्रभाग, घर, आपला परिसर, शहर स्वच्छ ठेवून धुळे शहर १०० टक्के स्वच्छ ठेवण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधुन आज १ ऑक्टोबर रोजी एक तारीख, एक घंटा (एक तारीख एक तास) हा स्वच्छता उपक्रम आज देशभरात माननीय प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत आहे. या मोहिमेतंर्गत आज संपूर्ण जिल्हाभरात प्रत्येक वार्ड, गाव, रस्ते येथे सर्व नागरिकांनी मोठया संख्येने आज ही मोहिम राबविली जात आहे. यावेळी सांगितले. यावेळी माझी वसुधंराची शपथ घेण्यात आली. यावेळी महापौर प्रतिभाताई चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, महापालिका आयुक्ता अमिता दगडे-पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वाहिद अली सय्यद यांनी केले. यावेळी विविध शाळेतील विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, रोटरी क्लब, युथ क्लब, गायत्री परिवार, एकविरा देवी मंदिर ट्रस्ट तसेच विविध सामाजिक संघटनाचे प्रतिनिधी तसेच धुळे जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वच्छता कागदावर नको, प्रत्यक्ष फिल्डवर काम दिसलं पाहिजे; मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

महात्मा गांधींच्या जयंतीचं औचित्य साधून, केंद्र सरकारनं स्वच्छता हीच सेवा मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला. याचपार्श्वभूमीवर राज्यासह देशभरात 'स्वच्छता हीच सेवा' उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गिरगाव चौपाटीवर स्वच्छता केली. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवडी किल्ल्यावर तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती स्वच्छता सेवा अभियानात सहभाग घेतला. तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी अहमदाबादेत सहभाग घेतला.

स्वच्छता हीच सेवा मोहीमेंतर्गत राज्यात 'एक तारीख एक तास' मोहिमेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून ७२ हजारांपेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छेतेची माहीम राबवण्यात आल्याची माहिती सीएमओ कार्यालयाकडून देण्यात आली आहे. गिरगाव चौपाटी येथे सुंदर महाराष्ट्राच्या दिशेनं एक पाऊल टाकण्यात आलं. उत्साही नागरिक, विद्यार्थी यांच्या जोडीने, राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मान्यवरांनी स्वत: हातात झाडू घेऊन श्रमदान केलं आणि स्वच्छतेसाठी 'एक तारीख, एक तास' या राज्यस्तरीय मोहिमेची सुरुवात केली.

## महाराष्ट्र नावाचा थंड गोळा

मुंबईतील एखाद्या सहकारी सहनिवासात मराठी असल्याबद्दल एखाद्या तरुणीला जागा नाकारणे आणि राज्य सरकारने दुकानांवर मराठी पाटीची सक्ती केल्यानंतर त्याच्या विरोधात थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घेणे; या दोन्ही कृतींमागची मनोवृत्ती एकच आहे. ती मनोवृत्ती मराठी भाषा, महाराष्ट्र हे मराठ्यांचे राज्य आणि मराठी अस्मिता यांना आम्ही जुमानत नाही, असे म्हणून त्यांचा उपमर्द करण्याची आहे.

मुंबईत फक्त पैशाची भाषा चालते; असे अनेकांचा समज आहे. काही मराठी नेते आणि नोकरशहा यांनी स्वार्थासाठी परप्रांतीयांची तळी उचलून हा समज पक्का केला आहे. महाराष्ट्राच्या राजधानीत संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर इतक्या वर्षांनी मराठी माणसांना असा अपमान सोसावा लागावा, याची लाजही कुणाला वाटत नाही. महाराष्ट्रासाठी १०७ हुतात्म्यांचे प्राण तर गेलेच; पण लाखो मराठी माणसे मुंबई-बेळगाव-कारवारसहित संयुक्त महाराष्ट्रासाठी अनेक वर्षे झुंजत होती. मुंबई ही मराठी माणसाच्या घामावर उभी राहिली आहे. तिच्यासाठी त्याने आपले रक्त आणि अश्रू वाहवले आहेत. प्राणांची पर्वा केलेली नाही. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर मराठी माणसाचे नाव घेणाऱ्या आणि न घेणाऱ्या अशा सर्वांनीच मराठी माणसाची घोर निराशा केली आहे. त्याच्यावर मुंबईतून हद्दपार व्हावे लागेल, अशी कारस्थाने केली आहेत. सगळ्या आघाड्यांवर मराठी माणसाची सतत पीछेहाट होईल अशी परिस्थिती धनदांडग्यांनी, जुन्या-नव्या दिल्लीश्वरांनी निर्माण केली आणि तिला मराठी माणसाच्या उद्धारकर्त्यांचा बुरखा पांघरलेल्या बहुतेकांनी खतपाणी घातले. आज जो मराठी माणसांचा मुंबईत जागा भाड्याने मिळणे किंवा साध्या दुकानांवरच्या पाट्या लावणे, यावरून जो अपमान होतो आहे, त्याची मूळ कारणे ही घरच्या म्हातारीचे काळ बनलेल्या मराठी नेतृत्वाच्या बोटचेप्या, आत्मघातकी वृत्तीत आहेत. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर इतक्या वर्षांनीही एकीकडे आम्ही मराठी ही अभिजात भाषा आहे, हे केंद्र सरकारला पटवून देऊ शकलेलो नाही आणि दुसरीकडे, ज्या मराठी माणसाच्या खिशावर ज्यांची दुकाने चालणार, त्यांनाही आम्ही 'तुमच्या दुकानी पाट्या मराठी भाषेत लावा' हे समजावू शकलो नाही. महाराष्ट्राचे राज्यकर्ते आणि समाज यांच्या अपयशाची कक्षा किती विस्तीर्ण आहे, हे यावरून लक्षात यावे. अभ्यासक महाराष्ट्राला दक्षिण आणि उत्तर भारताला जोडणारे सांस्कृतिक दुवाक्षेत्र मानतात. मात्र, महाराष्ट्राने दोन्हींकडून केवळ दुर्गुण घ्यायचे आणि दोघांचेही सद्गुण टाकायचे, अशी दुधारी नीती अवलंबली आहे. चेन्नई आणि तमिळनाडूत कोणत्याही पाटीवरची निम्मी जागा स्थानिक भाषेला म्हणजे तमिळला दिली नसेल तर लगेच दंड ठोठावला जातो. मग तिथल्या व्यापारी संघटना कोणत्या न्यायालयात गेल्या? तसे त्यांनी केले असते तर त्यांना 'दे माय धरणी ठाय..' करून सोडले असते.

बेंगळुरूची कीर्ती अलीकडे आयटीची राजधानी अशी आहे. तेथे महाराष्ट्रासहित देशभरातील हजारो तरुण-तरुणी कामे करतात. बेंगळुरूमध्ये सार्वजनिक दुकाने, उद्योग, मॉल, दवाखाने, बँका, शैक्षणिक संस्था यांच्या पाट्यांवर केवळ ४० टक्के जागा इंग्रजी किंवा कन्नडव्यतिरिक्त इतर भाषांसाठी राखीव असते. ६० टक्के जागा कन्नडसाठी राखीव असते. आणि महाराष्ट्रात मराठी पाट्या लावण्याला विरोध का, तर म्हणे 'आमच्यावर हा वाढीव खर्चाचा बोजा पडेल..' हे काय कारण झाले का? मराठी माणूस एकसंध आणि संघटित नाही. नाही तर, मराठी पाटी नसणाऱ्या सगळ्या दुकाने आणि उद्योगांवर बहिष्कार घालून त्यांना चार दिवसांत सरळ करता आले असते. मराठी माणूस आणि मराठी समाज यांच्याबद्दलचा उद्दाम तिरस्कार हा देशातील अनेक भाषकांमध्ये आहे. त्याची अनेक सांस्कृतिक, ऐतिहासिक, राजकीय कारणेही असू शकतील. मराठी माणसाला आधी 'पानिपता'पासून आणि नंतर टिळक व पुढे आंबेडकर यांच्या अस्तानंतर सगळीकडे माघार घेण्याची, शेपूट घालण्याची सामुदायिक सवय लागली आहे. ती काही जायला तयार नाही. मराठी माणसाचे नाव घेऊन ज्यांनी तलवारी परजल्या; तेही कधी ना कधी आश्रित म्हणूनच राहिले. महाराष्ट्राच्या उत्कर्षाचे मोठे स्वप्न पाहून ते प्रत्यक्षात आणण्याची हिंमत दाखविणारा मराठी समाज आपण उभा करू शकलेलो नाही. त्यामुळे, एका सुविद्य तरुणीला मुलुंडमध्ये जागा भाड्याने न देता घालवून दिले जाते. तिच्या डोळ्यांतून वाहिलेले क्षोभाचे, अपमानाचे अश्रू महाराष्ट्रात स्वाभिमानाचे अंगार पेटवू शकणार नाहीत. याचे कारण, टिळकांनी रानड्यांवरील मृत्युलेखात म्हटल्याप्रमाणे 'महाराष्ट्र हा थंड गोळा' होऊन पडला आहे. कुणावर सूड घेऊन, कुणावर हल्ले चढवून, कुणाचे कपडे फाडून मराठी माणूस, महाराष्ट्र आणि मराठी भाषा मोठी होणार नाही. तिचा स्वाभिमानही जपला जाणार नाही. त्यासाठी मराठी माणसाला विविध क्षेत्रांत पराक्रम गाजवावा लागेल. नुसते तीस-चाळीस तास नाचून चालणार नाही. आमच्या नेत्यांनी इंग्रजी आणि विशेषकरून हिंदीचे आक्रमण रोखण्यासाठी जागे व्हायला हवे. हिंदी मराठीला खाऊन टाकणार असेल, तर ते चालू देता कामा नये. मराठीच्या स्वाभिमानाचे पहिले तेजस्वी स्फुल्लिंग ज्ञानदेवांनी, नंतर छत्रपती शिवरायांनी आणि नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात पराक्रमी नेत्यांच्या चमूने चेतविले होते. आम्ही आता ते सारे विसरून गेलो आहोत. आमच्या भूमीवर आमच्या भाषेतल्या पाट्या वाचण्यासाठी आम्हाला सुप्रीम कोर्टाकडे पाहावे लागते आणि आमच्या मुली मराठी असल्यामुळे नकार आणि धिक्कार सोसून अपमानित होतात. हे स्वप्न संयुक्त महाराष्ट्र जिंकणाऱ्या सेनापतींनी आणि मराठ्यांनी पाहिले होते का?

# भारताशी पंगा; कॅनडाचा तोटा

हरदीप सिंह निज्जर या खलिस्तानवाद्याच्या हत्येनंतर भारत-कॅनडा यांच्यात संबंध बिघडले आहेत. दोन्ही देशांत अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी निज्जरच्या हत्येमध्ये भारताचा हात असल्याचे सांगून भारताला डिवचण्याचा प्रयत्न केला आहे. भारताने निज्जर हत्येप्रकरणी झालेले आरोप फेटाळून लावले, पण कॅनडाचे पंतप्रधान आपली भूमिका बदलण्यास तयार नाहीत.

भारत-कॅनडा यांच्यातील तणाव दिवसेंदिवस वाढत असल्याने दोन्ही देशांतील व्यापार-उद्योग व देवाण-घेवाणीवर परिणाम होऊ शकतो. काही भारतीय कंपन्या कॅनडातून आपला गाशा गुंडाळण्याच्या तयारीत आहेत. महिंद्रा अॅण्ड महिंद्रा तसेच जेएसडब्ल्यू स्टील या कंपन्या वातावरण शांत होण्याची वाट पाहात आहेत. कॅनडात अनेक भारतीय कंपन्या कार्यरत आहेत. टीसीएस, इन्फोसेस, विप्रो अशी नावे सांगता येतील. जवळपास तीस भारतीय कंपन्यांनी कोट्यवधींची गुंतवणूक कॅनडात केली आहे. याशिवाय भारतातून कॅनडाला कपडे, औषधे, ऑरगॅनिक रसायने, लोखंड, पोलाद, वैमानिक उपकरणे निर्यात होत असतात. दोन्ही देशांचा आयात-निर्यात व्यापार जवळपास समान आहे. गेल्या वर्षी भारताने कॅनडाला ३४ हजार कोटींचे सामान निर्यात केले, तर भारताने कॅनडाकडून ३५ हजार कोटींची सामग्री आयात केली.

कॅनडाकडून भारताला मसूर डाळ मोठ्या प्रमाणावर येत असते. भारत हा मसूर डाळीचा मोठा आयातदार आहे. मागणीच्या मानाने भारतात मसूर डाळीचे उत्पादन कमी होते. साधारणतः कॅनडाकडून भारत ६ लाख टन मसूर डाळीची आयात करतो. संबंध बिघडल्याने मसूर डाळीचे भाव भडकण्याची शक्यता आहे. भारत सरकारने रशियातून मसूर डाळ आयात करायला दोन वर्षांपूर्वीच परवानगी दिली आहे. स्वस्त दरात अन्य कोणत्या देशांतून डाळ आयात करता येईल, याची सध्या चाचपणी चालू आहे.

कॅनडामध्ये झालेल्या ताज्या जनगणनेत एकूण लोकसंख्येच्या २.१ टक्के शीख समुदाय तिथे वास्तव्याला आहे. कॅनडात राहणाऱ्या




शिखांची संख्या ८ लाख असावी. कॅनडात हा चौथ्या क्रमांकाचा हा समुदाय आहे. रोजगार व उद्योगासाठी शीख कॅनडात आले व त्याची आता निर्णायक व्होट बँक बनली आहे. लिबरल पार्टीने शिखांना कॅनडात राहण्यासाठी अनेक नियम शिथिल केले. कॅनडात टोरांटो, ओटावा, वॉटरलू, ब्रैम्प्टन इथे भारतीय लोक मोठ्या संख्येने राहात आहेत. कॅनडात शीख समाजाचे १५ संसदेत प्रतिनिधी (खासदार) आहेत. जस्टिन ट्रुडो यांच्या सरकारमध्ये शीख समाजाचे मंत्रीही आहेत. २०१६ मध्ये ४ शीख मंत्री होते. २०१८ नंतर कॅनडात शिक्षणासाठी येणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढत राहिले. भारतातून विशेषतः पंजाबमधून मोठ्या संख्येने विद्यार्थी कॅनडात शिक्षणासाठी येत आहेत. कॅनडाची अर्थव्यवस्था समृद्ध करण्यात तेथील शिक्षण क्षेत्राचा मोठा वाटा आहे. पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांना दीर्घकाळासाठी भारताशी पंगा घेणे हे कॅनडाला परवडणारे नाही. त्याचा परिणाम तेथील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. गेल्या दोन दशकांत अन्य देशांतून कॅनडामध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वेगाने वाढली. या घडीला ४ लाख २० हजार विदेशी विद्यार्थी कॅनडात शिकत आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो हे हरदीप सिंह निज्जर हत्या प्रकरणी भारताच्या विरोधात का भूमिका मांडत आहे, ते एवढे का आक्रमक झाले आहेत, हा कळीचा मुद्दा आहे. त्यांनी खलिस्तानवाद्यांची पाठराखण करण्याची जी भूमिका घेतली आहे, त्यामुळेच भारताची नाराजी त्यांनी अंगावर ओढवून घेतली. ते भारतात जी-२० परिषदेसाठी आले होते, त्यांच्यासाठी पंचतारांकित हॉटेलमध्ये राखीव असलेला प्रेसिडेंशिअल सूट त्यांनी नाकारला व नेहमीच्या खोलीत राहणे पंसत केले. हे सुद्धा एक गूढ होते. त्यांना भारत भेटीत विशेष महत्त्व मिळाले नाही. कॅनडात महागाई प्रचंड वाढली आहे. तसेच कॅनडाची अर्थव्यवस्था मंदीच्या दिशने वाटचाल करीत आहे. त्यांच्या लिबरल पार्टीच्या विरोधात त्या देशात अँटी इन्कबन्सी लाट असल्याचे बोलले जात आहे.

निज्जर हत्येप्रकरणात भारताचा हात आहे, असा गुप्तचर खात्याचा अहवाल अमेरिकेनेच कॅनडाला दिल्याचे वृत्त न्यूयॉर्क टाइम्सने प्रसिद्ध केले. ते जर वृत्त खरे असेल, तर भारताला हा विषय अधिक गांभीर्याने घ्यावा लागेल. कॅनडा, अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड अशा पाच देशात फाइव्ह आईज इंटेलिजन्स असा जो समझोता झाला आहे, त्यानुसार हे देश एकमेकांना मिळालेल्या माहितीची देवाण-घेवाण करीत असतात. निज्जर हत्या प्रकरणात चौकशीच्या कामात भारताने कॅनडाला सहकार्य करावे, असे अमेरिकेने म्हटले आहे.

निज्जरची हत्या झाल्यावर देशातील खलिस्तानवादी, गँगस्टर्स, दहशतवादी व फुटीरतावादी यांच्याविरोधात एनआयए (नॅशनल इन्व्हेस्टिगेटिव्ह एजन्सी)ने भारतभर मोहीमच सुरू केली. एनआयएने शीख फॉर जस्टिसचा म्होरक्या गुरपतवंत पन्नू याची अमृतसर व चंदिगडमधील मालमत्ता जप्त केली. भरसिंगपुरा येथील घरावर नोटीस चिकटवली. पंजाब पोलिसांनी गँगस्टर गोल्डी बराडला पकडण्यासाठी मोहीम उघडली आहे. स्पेशल ऑपरेशन टीमने एकाच दिवशी ११५९ छापे मारले. गुरपतवंत पन्नूचे चंदिगड सेक्टर १५ मधील घर पोलिसांनी जप्त केले. अमृतसरमधील शेतीही जप्त केली. पन्नू सध्या अमेरिकेत राहतो. याच पन्नूने २५ सप्टेंबरला व्हँकूवर, ओटावा व टोरांटो येथील भारतीय दूतावास बंद करावेत, अशी धमकी दिली होती. तसेच शीख फॉर जस्टिसने डेथ ऑफ इंडिया अशी मोहीम चालविणार असल्याची घोषणा केली होती. पन्नू म्हणतो, कॅनडाची भूमी खलिस्तानवाद्यांसाठी आहे. खलिस्तानी नेहमी कॅनडाबरोबर राहिले आहेत. हिंदूंचा देश भारत आहे. त्यांना कॅनडात राहायचे असेल, तर त्यांना धर्म बदलावा लागेल खलिस्तान कमांडो फोर्सचा प्रमुख म्हणून वावरणारा निज्जर हा भारतातून १९९७ मध्ये कॅनडाला पळून गेला. आपण सामाजिक संघटनेशी संबंधित आहोत, असे सांगून त्यांने कॅनडात आश्रय मागितला. कॅनडा सरकारने त्याचा अर्ज सुरुवातीला फेटाळला, पण नंतर त्याला नागरिकत्व मिळाले. नोव्हेंबर २०१४ मध्येच निज्जर विरोधात इंटरपोलने रेड कॉर्नर नोटीस जारी केली होती. त्याच्यावर भारतात डझनभर फौजदारी गुन्हे नोंदवलेले होते. भारतात त्याचा दहशतवादी कारवायांत सहभाग होता, असा सविस्तर अहवाल भारताने कॅनडा सरकारला दिला होता. पण तेथील सरकारने त्याच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. कॅनडा सरकारने हरदीप सिंह निज्जरचे नाव नो फ्लाय लिस्टमध्ये नोंदवले. पण यापलीकडे काही केले नाही. गेल्या ५ वर्षांत कॅनडाने कोणत्याही दहशतवाद्यावर कारवाई केलेली नाही. १३ खतरनाक दहशतवादी कॅनडात मोकाट आहेत. भारताने खलिस्तानवादी - दहशतवादी यांच्यावर कारवाई करावी, असे किमान २० वेळा तरी कॅनडाला आवाहन केले असावे. पण कॅनडाने प्रतिसाद दिला नाही. निज्जर हत्या प्रकरणी कॅनडाकडे भारताच्या विरोधात कोणताही ठोस पुरावा नाही. ४५ वर्षांच्या निज्जरची हत्या १८ जून रोजी झाली. साडे तीन महिने उलटले तरी कॅनडाच्या चौकशी यंत्रणांना यश लाभलेले नाही. भारतातील ४० टॉप दहशतवाद्यांच्या यादीत त्याचे नाव होते. विशेष म्हणजे निज्जर हा गुरुनानक शीख गुरुद्वाराचा अध्यक्ष होता. त्याचे गाव जालंदरमधील भरतसिंहपूर. त्याला हुडकून काढण्यासाठी भारत सरकारने १० लाखांचे इनाम घोषित केले होते. एनआयएने त्याला २०२२ मध्ये फरार म्हणून घोषित केले. भारत व कॅनडा हे दोन्ही लोकशाही देश आहेत. पण त्या देशात दहशतवाद्यांना संरक्षण का दिले जाते हे आकलनापलीकडचे आहे. व्होट बँक म्हणून शिखांविषयी राजकीय सहानुभूती असेल, पण खलिस्तानवाद्यांना तेथील सरकार का पाठबळ देत आहे, हे समजत नाही. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर मोठ्या संख्येने शीख कॅनडाला गेले व नंतर ओघ चालूच राहिला. टोरांटो व अन्य शहरातील गुरुद्वारांवर खलिस्तानची मागणी करणारे फलक उघडपणे झळकतात पण तेथे पोलीस प्रशासन कोणीही दखल घेत नाही, अशाने दहशतवाद्यांची हिम्मत वाढते. त्यातूनच भारत व कॅनडा यांच्यातील संबंधात तणाव निर्माण झाला आहे.

**- स्टेटलाइन : डॉ. सुकृत खांडेकर**

# झऱ्याचे पाणी....

**पाऊस लागल्यावर झऱ्यांना पाणी सुटते. म्हणजे पाण्याच्या उगमस्थानाला झरा म्हणतात, असे आपण म्हणतो. मात्र, झऱ्याच्या पाण्याची चव काही न्यारीच असते. यासाठी पावसाला सुरुवात झाल्यावर कोकणात यावे लागेल. आजही कोकणातील काही वाड्यांमध्ये पाऊस सुरू झाल्यावर झऱ्याला पाणी सुरू झाले की, त्या पाण्याचा वापर पिण्यासाठी नागरिक करतात. हे पाणी म्हणजे निसर्गाची देणगी असे स्थानिक लोक म्हणतात. आता जरी गावातील वाड्यावाड्यात नळ योजना सुरू करण्यात आल्या तरी त्याचे भाडे स्थानिक लोकांना परवडत नाही. फक्त पाणीटंचाईच्या वेळेला ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येणाऱ्या पाण्याचा वापर करतात.**



झऱ्याचा विचार करता ज्याठिकाणी पाण्याचा झरा असतो, त्याची पूर्व कल्पना स्थानिक नागरिकांना असते. त्यामुळे कधी एकदा पाऊस पडतो आणि झऱ्याला पाणी सुरू होते, असे त्यांना वाटत असते. एकदा का झरा सुरू झाला की, चार-पाच महिने पाण्याची चिंता मिटली असे समजा. झऱ्याच्या पाण्यात हंडा बुडण्यासाठी खड्डा खोदला जातो. इतकेच नव्हे तर दिवाळीच्या दरम्याने पूर्ण पाऊस जातो तेव्हा हे झऱ्याचे पाणी पण बंद होते. पाण्यासाठी खोदलेल्या खड्यात मासे पण मिळतात. त्यासाठी पाणी कमी कधी होते याची राखणे वाट पाहत असतात. अशा माशांचा सार सुद्धा कोकणात लोक आवडीने भाताबरोबर खातात.

महत्त्वाची बाब म्हणजे, झऱ्याच्या पाण्याची कोणत्याही प्रकारची काळजी घेतली जात नाही. स्थानिक लोक ज्याठिकाणी झऱ्याचा उगम होतो तेथील जागा साफ करतात. त्या पाण्याला सारखे बुडबुडे येत असतात. खड्डा खोदलेला असल्याने हंडा बुडवायचा आणि घेऊन यायचे. झऱ्याच्या पाण्यावर सूर्याची किरणे पडल्यावर लांबून पाणी चांदीसारखे चमकताना दिसते. त्यामुळे कोकणी माणूस झऱ्याचे पाणी अगदी कावळ्याच्या डोळ्यासारखे दिसते असे वर्णन करतात. कोकणात पावसाळ्यात शेतात काम करीत असताना शेतकरी राजा, वाटसरू आणि गुराखी झऱ्याचे पाणी पितात. झऱ्याच्या पाण्याची चव म्हणजे सध्याच्या बिसलरीच्या बॉटलमधील पाण्यापेक्षा मधुर असते. एकवेळ बॉटलमधील पाणी पिल्याने सर्दी-खोकला होऊ शकतो. मात्र झयाच्या पाण्याने काहीही होत नाही. म्हणतात ना शेवटी नैसर्गिक ते नैसर्गिक. या पाण्याला कोणत्याही प्रकारचा कर द्यावा लागत नाही. वाहणारे स्वच्छ पाणी इतकीच त्याची ओळख. हे वाहते पाणी असल्याने फिल्टर करण्याची आवश्यकता नाही. कोणीही पाणी गढूळ किंवा दूषित करत नाहीत. काही वेळा या पाण्याचा उपयोग गुरे सुद्धा पितात. ते पाणी वाहत असल्याने जंगली प्राणी सुद्धा पितात तसेच उन्हामुळे गर्मी वाढत असल्याने झऱ्याच्या वाहणाऱ्या पाण्यात बसतात. त्यामुळे त्यांना थंडावा मिळतो.अशा या निसर्गनिर्मित निर्माण झालेल्या झऱ्यांना शासकीय आसरा दिला पाहिजे. बऱ्याच ठिकाणी असे पाणी वाहत नाल्याला मिळते. नंतर नदीला मिळून शेवटी समुद्राला जावून मिळते. तेव्हा हे पाणी पिण्यायोग्य असते. तेव्हा त्याचा साठा कसा करता येईल यासाठी विशेष प्रयत्न झाले पाहिजे.


झरा निसर्गाच्या खुशीत उगवल्याने पर्यटकांचा ओढा सुद्धा वाढेल. त्यासाठी त्याची स्थानिक पातळीवर देखभाल होणे आवश्यक आहे. तसेच शासकीय स्तरावर आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. केवळ धबधबे बघून किंवा त्या पाण्यात उभे राहून मस्ती करत वेळ वाया घालविण्यापेक्षा खरी मजा ही धबधब्याच्या पाण्याचा उगम कुठे झाला हे पाहण्यात असते. म्हणजे समजेल धबधब्याचे अस्तिस्त कशामुळे निर्माण झाले आहे. धबधब्याचा इतिहास पाहण्यापूर्वी जे पाणी धबधब्यात येते, ते कुठून येते? त्याचा उगम कुठे झाला? केवळ पावसाळ्यात डोंगरावरून खाली पडणाऱ्या पाण्यात खेळ खेळण्यापेक्षा पाण्याचा उगम कुठे झाला याचा शोध घेऊन त्याचे संगोपन केल्यास अजून काही महिने धबधब्याचा आनंद लुटता येईल. याचा परिणाम त्या ग्रामपंचायतीला महसूल मिळण्याला तसेच त्या गावातील स्थानिक बेरोजगारांना रोजगार मिळण्यास मदत होईल. त्यासाठी प्रत्येक गोष्टीचे संशोधन झाले पाहिजे. म्हणजे त्यातून नक्कीच आर्थिक लाभ होऊ शकतो. तेव्हा जलक्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन खूप मोलाचे आहे. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग अशा कारणासाठी केला पाहिजे.

झऱ्याचे पाणी पिण्यालायक जरी असले तरी त्याचा कशाप्रकारे साठा करू शकतो. ते पाणी जमिनीत जिरवू शकतो का?, त्याप्रमाणे प्रयत्न झाले पाहिजेत. मात्र तसे आपल्या देशात होत नाही हे दुर्दैव आहे. आता जे काही नैसर्गिक आहे त्याचा वापर कसा केला पाहिजे, यासाठी त्या क्षेत्रातील संशोधन मंडळींनी पुढे येणे आवश्यक आहे. तरच झऱ्याचे वाया जाणाऱ्या पाण्याचा योग्य उपयोग केला जावू शकतो. अशा नैसर्गिक पाण्याचा साठा कशा प्रकारे करता येईल त्या दृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे. यातून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटून स्थानिक रहिवाशांना आर्थिक उत्पन्न सुद्धा मिळू शकते. आजही ग्रामीण भागातील बऱ्याच वाड्यातील वस्तीवर गेल्यास तेथील रहिवासी झऱ्याचे पाणी पिऊन आपली तहान भागवीत असतात.

थोडक्यात असे म्हणता येईल की, ज्याप्रमाणे गरम पाण्याच्या झऱ्याची काळजी शासन दरबारी घेतली जाते त्याप्रमाणे पावसाळ्यात ज्या ठिकाणी झरा उगवतो त्या ठिकाणची शासन स्तरावर देखभाल होणे गरजेचे आहे. असे जर झाले तर ग्रामीण भागातील उन्हाळ्यात होणारी पाणीटंचाई दूर होऊ शकते.

**- रवींद्र तांबे**

## शब्दकोडे-१९२



**आडवे शब्द**

१. 'अवजड' झालेले माजी मुख्यमंत्री ८. हल्लीच्या युगात याच्याशिवाय नमस्कार नाही! ११. मजबूत १२. नेत्र, डोळा १३. रक्षा १४. प्रजा १६. काहींसाठी हे निद्रासन १७. वन्य जीव १९. घागरा २१. कलावंत २२. मोठी टोपली २३. अर्जुनाचा रथ चालवणारा श्रीकृष्ण २४. युद्ध २७. श्री विष्णूचा बटु अवतार ३०. भांडणातील कळीचा मुद्दा ३२. उत्तराधिकारी ३५. बाजार ३६. तोफगाडी ३८. रविवार ४०. अनुमती ४३. सडेतोड, स्पष्ट ४५. कडक व चिवट ४६. वजनदार, हिंदीत पायाभूत उद्योगाला 'भारी' शब्द ४८. स्वयंप्रकाशी किडा ४९. देव ५०. पोते ५२. महान ५३. हद्दपार ५४. गणपतीचे एक नाव ५५. गुजराथी नृत्यप्रकार ५८. विपुलता, रेलचेल ६०. सुसर ६३. श्री विष्णूचा अष्टाक्षरी मंत्र ६७. धाक, भीती ६९. पातक ७०. गाढव ७१. उदार, देणारा ७२. कुळाशी करारमदार ७४. उत्सवाचे दिवस ७५. स्वीकारच्या विरूद्ध ७६. लोण्यासाठी भांडणारा

**उभे शब्द**

१. विस्मरण २. सदोदित ३. संताप, क्रोध ४. भाजणीपासून बटाट्यापर्यंत कुठलाही असला तरी चवदार ५. मंदवासर ६. खोदकाम ७. करंजी ८. सजीव-निर्जीव सर्व ९. महिरप १०. रड्या माणूस १५. योग्य, बरोबर १६. हिंदीत संशय १८. असंमती १९. उद्याच्या नंतरचा दिवस २०. मोठमोठे पराक्रमी योद्धे २१. हात २३. मर्यादा २४. एक तंतुवाद्य २५. मृत्यू २६. शिष्य २८. अपशकुन २९. बारीक दगड ३०. व्यायाम ३१. सखोल ३३. सूर्याचे एक नाव ३४. प्रश्नोत्तरे ३७. स्वराचे वरदान लाभलेला ३९. कमळ ४०. दिवंगत ज्येष्ठ खलनायिका, ललिता --- ४१. पूर्वज ४२. कवी ४४. मावा ४६. अपमान ४७. भीती ४८. लोखंड घासण्याचे हत्यार ४९. काजळाचा एक प्रकार ५१. बायको ५३. लोकनाट्य ५६. श्री विष्णूचे एक नाव ५७. बगिचा ५९. मजबूत ६१. रात्र ६२. उलट, विरूद्ध ६४. लंकेचा राजा ६५. बाई ६६. सफल झालेला ६८. फणसाचा एक प्रकार ६९. बासरी ७१. दरवाजा ७३. ठोकताळा, अंदाज

## शब्दकोडे १९१ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.रुजवात ३.समरसता ६.माणूसघाणा ९.रत १०.पारो ११.पतन १३.वाट १४.सानविवि १७.वनवास १९.यावनाल २२.शानदार २३.ललकारी २४.गज २५.कालव २६.सदा २७. बरबाद २९.वाल ३०.सटरफटर ३३.बरका ३५.साहस ३७.पारवा ३८.कसरत ४०.वाव ४१.रमणी ४२.साईबाबा ४५.राजा ४६.फणस ४७.धाव ४८.गवगवा ५०.दाम ५२.मणेर ५४.दादला ५५.नयनबाण ५८.जनकजननी ६१.पंक ६२.शीर ६३.रवा ६५.पर ६६.हालचाल ६९.तप ७१.विप्र ७२.नवरस ७४.समतल ७६.रमावर ७८.धाम ८०.रसदार ८१.तनमनधन ८२.पोट ८३.रवानगी

**उभे उत्तर**

१.रुखसाना २.जतन ३.सरोवर ४.रखवालदार ५.ताप ६.मानव ७.सवालजबाब ८.घाट १२.तयारी १५.विशाल १६.विनवणी १८.सल २०.नागर २१.ब्याद २५.कालहरण २६.सटवाई २८.दरवाजा २९.वासा ३०.सरसावणे ३१.टक ३२.रस ३४.काव ३६.समसमान ३९.रम्य ४३.बाग ४४.बावनकशी ४५.रामदास ४६.फर्मान ४७.धामण ४९.वाचन ५१.कलाकार ५३.रजक ५६.यमल ५७.बादल ५९.जरतर ६०.नीर ६५.पंतप्रधान ६४.वारसदार ६५.पाळत ६६.हावरट ६७.चाकवत ६८.धन ७०.पसरट ७३.वसा ७५.मरवा ७७.रन ७९.मध

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### विवाह योग्य मुलगी मिळवून देण्याच्या नावाखाली फसवणूक

**नाशिक ।** मुलींची संख्या कमी झाल्याने विवाह इच्छुक मुलांना मुली मिळत नाही. या परिस्थितीचा गैरफायदा घेत भायाळे येथील एका व्यक्तीची सुरगाणा व पेठमधील चौघांनी एक लाख तीन हजार रुपयांची फसवणूक करण्याचा प्रकार घडला. भायाळे येथील ४९ वर्षीय व्यक्तीने विवाहयोग्य मुलगी शोधण्यासाठी अनेकांना सांगितले होते. यातून त्यांची सुनील चौधरी, कृष्णा गावित, जगन चौधरी व मुलगी संगीता गांगुर्डे तसेच मुलीचा मामाची ओळख झाली होती. मांदा येथे मुलगी बघितली. मुलीचे पुढचे आयुष्य सुखकर जावे यासाठी अगोदरच तिच्या नावावर बँकेत पैसे टाकण्याचे ठरले होते. फिर्यादीस वारंवार फोन करून ३२ हजार ५०० रुपये फोन पे द्वारे तर उंबरठाण येथे रोख ७० हजार ५०० रुपये रोख स्वरूपात घेतले. नंतर या चौघांनीही विवाह जमवून देण्यास नकार दिला. शिवाय रक्कमही परत केली नाही. रक्कम मागितली असता शिवीगाळ केल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

# साठीनंतर ज्येष्ठांनी वेदनाशामक औषधे टाळावे- डॉ. गुंजाळ

## श्री सप्तश्रृंगी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे व्याख्यान संपन्न





**नाशिक । प्रतिनिधी**

वयाच्या साठीनंतर शरीरातील स्नायू आणि अवयवांची झीज होते. त्यामुळे पाठदुखी, कंबरदुखी, मानदुखी, गुडघेदुखी, हातापायांना मुंग्या येणे, संधीवात व तत्सम आजार उद्भवतात. त्यावर जास्त प्रमाणात पेनकिलर घेऊ नये. त्यामुळे आपल्या किडनीवर वाईट परिणाम होतो किंवा लगेच ऑपरेशन हा उपाय नसून ज्येष्ठांनी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा किंवा हलके व्यायाम करावेत असा सल्ला नाशिक पेन क्लिनीकचे मणकेविकार तज्ञ डॉ. विशाल गुंजाळ यांनी दिला.

सातपूर येथील श्री सप्तश्रृंगी ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमाप्रसंगी डॉ. गुंजाळ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संघाचे अध्यक्ष किसनराव खताळे, शांताराम जमदाडे, प्रकाश महाजन, लोकज्योतीचे जितेंद्र येवले, प्रकाश घ्यार, शांताराम पाटील, हिराबाई सोनवणे उपस्थित होते.

यावेळी महिलांनी व सदस्यांनी विविध आजार व समस्यांचे निराकरण याविषयी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत डॉ. गुंजाळ यांनी व्यायामाचे हलके प्रकार सांगितले. मणके विकार टाळायचे असल्यास आता ऑपरेशनची गरज नाही. प्रगत तंत्रज्ञान व संशोधनामुळे इंजेक्शन व औषधोपचारामुळेही मणकेविकाराचा त्रास टाळता येणे शक्य झाले आहे. त्यामुळे कुठलेही दुखणे अंगावर काढण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी रंगनाथ आंधळे, पंढरीनाथ गायखे, चंद्रकांत निर्वाण, भगवान ठाकूर, संध्या देवरे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रकाश महाजन यांनी केले तर आभार शांताराम जमदाडे यांनी मानले.

# ग्रामपंचायत लासलगाव येथे अमृत कलश यात्रेची सवाद्य मिरवणूक



**लासलगाव । वार्ताहर**

आजादीचा अमृत महोत्सव निमित्त 'मेरी मिट्टी, मेरा देश' या अभियाना अंतर्गत अमृत कलश यात्रेचे आयोजन ग्रामपंचायत लासलगाव येथे करण्यात आले.अमृत कलश यात्रेचे आयोजन ग्रामपंचायत लासलगाव ने करून या कलश यात्रेमध्ये येथील जेष्ठ नागरिक संघ, लोकनेते दत्ताजी पाटील माध्य. आणि उच्च माध्यमिक विद्यालय, श्री महावीर विद्यालय लासलगावचे शिक्षक, विद्यार्थी, डॉक्टर असोसिएशन, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्त्या, बचत गट प्रतिनिधी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता. सरपंच जयदत्त होळकर यांच्या हस्ते श्रीफळ फोडून प्रभात फेरीची सुरवात करण्यात येऊन पंचप्राण शपत घेऊन कार्यक्रमांची सांगता करण्यात आली. पारंपरिक वाद्याच्या गजरात ग्रामपंचायत कार्यालय समोरून प्रभात फेरीला सुरवात होऊन गावंतर्गत मिरवणूक काढण्यात आली. प्रभात फेरी मध्ये 'मेरी मिट्टी मेरा देश', माझी माती माझा देश, भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषना देण्यात आल्या.

तसेच माझी माती, माझा देश या आशयाचा बॅनर प्रभात फेरी द्वारे झळकताना दिसून आले. यावेळी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी ट्रॅक्टर व ट्रॉली सजविले होते. सजविलेल्या ट्रॉलीमध्ये ८ फुटी कलश ठेवून सुशोभीकरण केले होते. फेरी दरम्यान कलशामध्ये गावातील शेतकरी बांधव यांनी एक मूठ माती व ज्यांच्याकडे शेती नाही अशांनी एक मूठ तांदूळ टाकले. गावातून प्रभातफेरी ग्रामपंचायतीचे पटांगणावर आल्यावर येथे उपस्थितांनी पंचप्राण प्रतिज्ञा घेण्यात आली.

यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच जयदत्त होळकर, ग्रामपंचायत सदस्य चंद्रशेखर होळकर, अफजल शेख, रोहित पाटील, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अशोक नाना होळकर, डॉ.कैलास पाटील, त्रंबकराज बिरार, अरविंद देसाई, विस्तार अधिकारी सुधाकर सोनवणे, ग्रामविकास अधिकारी शरद पाटील, ग्रामविकास अधिकारी धिवर, लासलगाव ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# भाजपा किसान मोर्चा उत्तर महाराष्ट्र महामंत्रीपदी रवींद्र अमृतकर

### कार्यकारिणी जाहीर

**नाशिक । प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे यांनी आपली १०१ सदस्यांची प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली आहे. उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस (महामंत्री) पदी महाकिसान वृद्धी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र अमृतकर यांची नियुक्ती झाली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सध्या तसेच आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात घेतलेली कृषी विषयक धोरणे जनमानसात पोहचविण्यासाठी भाजप किसान मोर्चाचा प्रत्येक कार्यकर्ता प्रयत्नशील राहिल असे प्रतिपादन किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश तात्या भेगडे यांनी केले आहे.

प्रदेश कार्यकारिणीमध्ये खजिनदारपदी समीर मिश्रा मुंबई तर प्रदेश प्रसिद्धी प्रमुखपदी सोमनाथ आहेर नवी मुंबई यांचा समावेश आहे. उत्तर महाराष्ट्र पदाधिकारी पुढील प्रमाणे - ३ प्रदेश उपाध्यक्ष- राजेंद्र (श्याम) राजपूत नंदुरबार, पोपट (तात्या) भोळे जळगाव, बाबासाहेब डमाळे (पाटील) नाशिक. प्रदेश सचिव - रवींद्र थोरात अहमदनगर, संभाजी यशवंत पगारे धुळे, सोपान काका दरेकर विंचूर नाशिक, डॉ. किशोर पाटील नंदुरबार. उत्तर महाराष्ट्र शेतकरी उत्पादक कंपनी प्रमुख - बिंदूशेठ शर्मा सटाणा, सोशल मीडिया प्रशांत पाटील धुळे, कृषी पदवीधर विभाग अनिकेत सोनवणे बागलाण नाशिक, प्रदेश कार्यकारिणी सदस्य - संपत नागरे नाशिक, रमेश पिंपळे अहमदनगर, सुरेश धनके जळगांव, दीपक नरवडे चौंभूत पारनेर अहमदनगर, प्रदीप - मोतीलाल सोनवणे देवळा नाशिक, शिवशाहीर सुनील चिंचोलीकर नेवासा अहमदनगर याप्रमाणे कार्यकारिणी आहे.

### रागातून पत्नीला हातोड्याने मारहाण

**नाशिक ।** स्वयंपाक कमी केल्याच्या रागातून पतीने पत्नीला हातोड्याने मारहाण केल्याचा प्रकार पंचवटी परिसरातील वाघाडी येथे घडला. पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेली माहिती आणि पीडित विवाहितेने दिलेल्या तक्रारीनुसार, पती घरी आल्यानंतर जेवण करत असताना स्वयंपाक संपला. पतीने स्वयंपाक कमी का केला अशी विचारणा करत रागातून घरात पडलेला हातोड्याने पत्नीला मारहाण केली. यात पत्नीच्या डोके, हात व कमरेला मार बसला. वरिष्ठ निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# क्रेडाई नाशिक मेट्रोची सर्वसाधारण सभा संपन्न

### सदस्यांनी घेतली स्वच्छतेची शपथ

**नाशिक । प्रतिनिधी**



क्रेडाई नाशिक मेट्रोची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. या सभेसाठी केंद्रीय आरोग्य व कुटंबकल्याण राज्यमंत्री डॉ.भारती पवार यांनी ऑनलाईन माध्यमाद्वारे सर्व सभासदांची संवाद साधला.

डॉ.भारती पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साजऱ्या करण्यात येणाऱ्या येत्या गांधी जयंती निमित्त असलेल्या उपक्रमा अंतर्गत सर्व सभासदांना स्वच्छ अभियान व क्वालिटी सिटी नाशिक अंतर्गत स्वच्छतेची शपथ दिली. जवळपास दोनशेहून अधिक सभासद यांनी ही शपथ घेतली. सकाळी ११ वाजता सर्व सभासदांनी आपापल्या साइटवर सर्व बांधकाम कामगार बंधू व भगिनी यांच्याकडून तसेच सर्व ऑफिस स्टाफ यांचेकडूनही शपथ देण्यात आली.

तसेच स्वच्छता सेवा अंतर्गत १ ऑक्टो रोजी क्रेडाई नाशिक मेट्रो चे सभासद शहरातील ठक्कर बाझार आणि महामार्ग बस स्थानक येथे सकाळी १०.३० पासून स्वच्छता मोहीम राबविणार आहेत. तसेच ही मोहीम सर्व सभासद आपल्या बांधकाम साईट वर पण राबवणार असल्याची माहिती अध्यक्ष कृणाल पाटील यांनी दिली

या सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित असलेले जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सर्व सभासदांना शहराचा कुंभमेळ्याच्या अनुषंगाने येणारा विकास व त्यात सर्वांचा सहभाग यावर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी क्वालिटी सिटी नाशिकचे प्रवर्तक जितू भाई ठक्कर तसेच क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील, माजी अध्यक्ष सुरेश पाटील, रवी महाजन, ज्येष्ठ सभासद शशी जाधव व सर्व मॅनेजिंग कमिटी सदस्य, नाबार्डचे विजय इंद्र सिंग व मधु तसेच क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया क्वालिटी नासिकची सर्व टीम उपस्थित होती.

# मुंबई अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी खासदार समीर भुजबळ यांचे नाशकात जल्लोषात स्वागत

**नाशिक । प्रतिनिधी**





माजी खासदार समीर भुजबळ यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या मुंबई अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर नाशिक भुजबळ फार्म येथील कार्यालयात पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाभरातील विविध नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्या भेटी घेऊन त्यांचा सन्मान केला.

यावेळी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, माजी खासदार देविदास पिंगळे, आ. हिरामण खोसकर, माजी आमदार जयवंतराव जाधव, शिवराम झोले, अभिनेता चिन्मय उदगीरकर, प्रदेश पदाधिकारी नानासाहेब महाले, दिलीप खैरे, बाळासाहेब कर्डक, जिल्हाध्यक्ष ड.रविंद्र पगार, जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधूणे, कार्याध्यक्ष गोरख बोडके, शहराध्यक्ष कविता कर्डक, महिला शहराध्यक्षा योगिता आहेर, महिला जिल्हाध्यक्षा प्रेरणा बलकवडे, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, युवक जिल्हाध्यक्ष चेतन कासव, योगेश निसाळ, आनंद सोनवणे, कैलास मुदलियार, समाधान जेजुरकर, डॉ. योगेश गोसावी, ज्ञानेश्वर शेवाळे, आशा भंदुरे, पूजा आहेर, विजय पवार, शंकर मोकळ, नाना पवार, नाना सोमवंशी, रवि हिरवे, यशवंत शिरसाठ, प्रा.ज्ञानेश्वर दराडे, सुनिल पैठणकर, राजू भांडगे, भाऊसाहेब धनवटे, संतोष खैरनार, विनोद शेलार, योगेश कमोद, भालचंद्र भुजबळ, संदीप खैरे, संदीप गांगुर्डे, शिवा काळे, राजेंद्र जगझाप, आकाश कदम, प्रसाद सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# चांदशीच्या ज्येष्ठ नागरिकांनी लुटला करमणूक कार्यक्रमांचा मनसोक्त आनंद

**नाशिक । प्रतिनिधी**



चांदशी ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या सदस्यांनी गप्पा-गोष्टी, शारीरिक व्यायाम, योगासने करून तसेच अंताक्षरी आणि भेंड्या खेळून ज्येष्ठ नागरिक दिनाचा मनमुराद आनंद लुटला.

तुळजा भवानीमाता मंदिर परिसरात हा कार्यक्रम साजरा झाला. यावेळी उपस्थित सर्व सदस्यांनी करमणुकीचे विविध कार्यक्रम सादर केले. काहींनी विनोद सांगितले तर काहींनी आपल्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेतला. काहींनी आपण कसे घडलो आणि अडथळे पार करत उच्च पदांपर्यंत कसे पोहोचलो याचे वर्णन केले. ज्येष्ठ नागरिक झालो तरी सामाजिक कार्यात सतत पुढाकार घेऊन आपले अस्तित्व सिद्ध करा असे आवाहन प्राचार्य डॉ.पंडितराव पवार, संघाचे अध्यक्ष दत्तू सोनवणे आणि प्राचार्या ज्योत्स्ना जाधव यांनी केले.

यावेळी गणपत सोनवणे, बाळासाहेब सोनवणे, भगवान मोरे, एकनाथ शिरसाठ, अरुण कोरडे, भगिरथ मंडलिक, संभाजी शेवाळे, प्रियदर्शन टांकसाळे आदी उपस्थित होते.

# अखिल भारतीय ऑटोमोबाईल फेडरेशन नवी दिल्लीच्या अध्यक्षपदी नाशिकचे संजय सोनवणे

### प्रथमच मराठी व्यक्तीला मान, देशभरातील प्रतिनिधी उपस्थित

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतातील सर्व रिजन मधील ऑटोमोबाईल डीलर्सच्या असोसिएशन यांची शिखर संस्था फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ऑटोमोबाईल स्पेयर पार्टस डीलर असोसिएशन नवी दिल्ली यांची वार्षिक सर्वसाधारण सभा नाशिक येथे पार पडली. नाशिक मोटार मर्चंट असोसिएशनतर्फे सभेचे आयोजन करण्यात आले होते. यात अखिल भारतीय ऑटोमोबाईल फेडरेशन नवी दिल्लीच्या अध्यक्षपदी



**ऑटोमोबाईल डीलर्सच्या अनेक समस्या आणि जीएसटीच्या दराबाबत माहिती दिली. यात सर्वात महत्वाचे म्हणजे अजूनही बऱ्याच अश्या ऑटो प्रॉडक्टवर २८ टक्के जीएसटी लागू आहे. मालवाहतूक करणाऱ्या वाहनांवर यामुळे देखभाल खर्च वाढतो आणि परिणामी वाहतूक खर्च हामाल वाहतुकीवर बोजा वाढून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम हा महागाई वाढ होऊन ग्राहकांना सोसावा लागतो. याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी, यासाठी शासन दरबारी प्रयत्न करण्यात येणार आहे.**

**- संजय सोनवणे, नूतन अध्यक्ष**

नाशिक मधील इंडिल्युब ऑईलचे संचालक, निमाचे विश्वस्त तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उत्तर महाराष्ट्र चेअरमन प्रख्यात उद्योजक नाशिकचे संजय सोनवणे यांची एकमताने निवड करण्यात आली.

सभेसाठी बंगाल, आसाम, दिल्ली, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक येथून प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष उललेखनीय बाब म्हणजे या संस्थेवर मागील पन्नास वर्षात पहिली मराठी व्यक्ती ही या राष्ट्रीय स्तरावर कार्यरत शिखर संस्थेवर अध्यक्षपदी विराजमान झाली आहे.

ऑटोमोबाईल शेत्राचा वाटा हा भारतातील औद्योगिक विकासात ३३ टक्केहून अधिक आहे.

मागील काही वर्षांपासून ऑटोमोबाईल क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या अनेक समस्या या रिटेल ट्रेड मधील डीलर्स यांना भेडसावत आहेत. ऑटोमोबाईल रिटेल क्षेत्रातील व्यापारात होणारी आर्थिक उलाढाल ही मालवाहतूक करणाऱ्या क्षेत्राशी सलग्न आहे. सभेत नाशिकमधील तींदरपाल चड्ढा, कैलाश चावला, साजिद शेख यांची पदाधिकारीपदी निवड करण्यात आली.

मोटार मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष घनश्याम ठाकूर, चंद्रकांत सानप, जयवंत पाटील, मनोज खैरनार, सचिन चव्हाण व इतर सदस्यांनी प्रयत्न केले. सोनवणे यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. त्यांच्या निवडीने नाशिकमधील व्यक्तीची राष्ट्रीय स्तरावर नियुक्ती ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहेत. सभेसाठी बंगाल, आसाम, दिल्ली, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक येथून प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष उललेखनीय बाब म्हणजे या संस्थेवर मागील पन्नास वर्षात पहिली मराठी व्यक्ती ही या राष्ट्रीय स्तरावर कार्यरत शिखर संस्थेवर अध्यक्षपदी विराजमान झाली आहे.

# पोल्ट्रीचे पत्रे उडून २५० कोंबड्यांचा मृत्यू

**लासलगाव । वार्ताहर**

इगतपुरी तालुक्यातील कावनई शिवारातील मुकणे धरणालगत शुक्रवारी ( दि. २९) दुपारी ४ वाजेदरम्यान चक्रीवादळासह झालेल्या पावसाने पोल्ट्रीचे पत्रे उडून त्यातील २५०च्या आसपास कोंबड्यांचा मृत्यू झाला असून यात अंदाजे एक ते सव्वा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

कावनई येथील मुकणे धरणालगतच्या शेतात मिनीनाथ गुळवे यांचे पोल्ट्री फार्म आहे. दरम्यान, हे चक्रीवादळ इतके भयानक होते की जणू काही ढगफुटी झाली आहे काय असे वाटत होते. मात्र या चक्रीवादळाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून याची परिसरात चर्चा आहे. दि. २९ रोजी दुपारी ४ वाजेदरम्यान वातावरणात अचानक बदल होऊन धरणाच्या दिशेने चक्रीवादळ तयार झाले व जोरदार पाऊसही असल्याने हे वादळ थेट जवळच असलेल्या गुळवे यांच्या पोल्ट्री फार्मवर आले व यात सुरुवातीला पोल्ट्री फार्मवरील पत्रे फुटून शेडमध्ये असलेल्या कोंबड्या मरण पावल्या. कावनई येथील मुकणे धरणालगतच्या शेतात मिनीनाथ गुळवे यांचे पोल्ट्री फार्म आहे. दरम्यान, हे चक्रीवादळ इतके भयानक होते की जणू काही ढगफुटी झाली आहे काय असे वाटत होते.

## न्यूज कॉलम

### प्लास्टरला नकार; माय-लेकीस मारहाण

**धुळे ।** घराच्या वरच्या मजल्याच्या भिंतीचे प्लास्टर करण्यास नकार दिल्याने बोरीस (ता. धुळे) येथे माय-लेकीस चौघांनी मारहाण केली. शिवीगाळ करून धमकी दिली. संगीता शिवाजी देवरे (रा. बोरीस) यांच्या फिर्यादीवरून जगन वामन देवरे, जिजाबाई जगन्नाथ देवरे, चेतन जगन्नाथ देवरे, गायत्री चेतन देवरे यांच्याविरुद्ध सोनगीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### फार्मसीमध्ये फार्मसिस्ट दिन साजरा

**शिरपूर ।** येथील आर. सी. पटेल फार्मसी कॉलेज तर्फे आंतरराष्ट्रीय फार्मसिस्ट दिन साजरा करण्यात आला. प्रतिज्ञा ग्रहण आणि भित्तीपत्रक सादरीकरण स्पर्धा आयोजित केली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, प्राचार्य डॉ. एन. जी. हासवाणी होते. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. एन. जी. हासवाणी यांनी सादरीकरण स्पर्धाचे स्वरूप आणि रूपरेषा विशद केली. तसेच दिनविशेष बद्दल सखोल मार्गदर्शन केले. फार्मसिस्टची महत्त्वाची भूमिका हि निर्दोष आणि सकारात्मक फार्मसी प्रॅक्टिसवर जोर देणे हि आहे अश्या आशयाचे विवेचन केले. प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा यांनी भाषणात महाविद्यालयाची वाटचाल थोडक्यात प्रतिपदीत करत अनेक विषयांवर मार्गदर्शन केले.

# नाशिक विभाग शिक्षक मतदार संघासाठी मतदार नोंदणी कार्यक्रम जाहीर

## शिक्षक मतदारसंघासाठी शिक्षकांनी नव्याने नाव नोंदवावे : अभिनव गोयल

**धुळे । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ नोव्हेंबर २०२३ या अर्हता दिनांकावर आधारित नाशिक विभाग शिक्षक मतदार संघासाठी मतदार नोंदणी कार्यक्रम जाहिर झाला आहे. नाशिक विभाग शिक्षक मतदार संघासाठी यापुर्वीची शिक्षण मतदारसंघाची मतदार यादी या निवडणुकीसाठी वापरण्यात येणार नसल्याने सन २०२३ च्या निवडणुकीसाठी नव्याने मतदार यादी तयार करण्यासाठी धुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकांनी नाव नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात नाशिक विभाग शिक्षक मतदार नोंदणी कार्यक्रम जाहिर करण्याबाबत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. बैठकीस उप जिल्हा निवडणूक अधिकारी अरविंद अतुर्लीकर, उपजिल्हाधिकारी सुरेखा चव्हाण आदि उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. गोयल यावेळी म्हणाले, पुढील वर्षी होणार्या नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी मतदार नोंदणी प्रक्रिया आजपासून सुरु होत आहे. आजपासून सुरु होणारी ही नोंदणी ६ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत सुरु राहणार आहे. नाशिक विभाग शिक्षक मतदार संघासाठी सर्वसाधारण निवासी असलेले आणि १ नोव्हेंबर २०२३ पूर्वी लगतच्या सहा वर्षामध्ये किमान तीन वर्षे माध्यमिक शाळेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या शैक्षणिक संस्थेत शिक्षक म्हणून काम केलेले व्यक्ती मतदार नोंदणीसाठी पात्र असतील. शिक्षक मतदार नोंदणीसाठी अर्ज क्रमांक १९ भरून, त्यासोबत निवासाचा पुरावा आणि विहित नमुन्यातील शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाचे प्रमाणपत्र द्यावे लागणार आहे. मतदाराने अर्जात आधार क्रमांक नमूद करणे ऐच्छिक असेल आणि आधार क्रमांक दिला नाही म्हणून अर्ज नाकारला जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत मतदाराचा आधार तपशील सार्वजनिक केला जाणार नाही, असेही श्री. गोयल यांनी सांगितले. यात शासनाने अर्हतेविषयी अटी दिल्या आहेत. नाशिक विभाग शिक्षक मतदार नोंदणी अर्हता अर्जदार नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघातील स्थानिक रहिवासी असावा. यासाठी अर्जदारांनी आपले निवडणूक ओळखपत्राची किंवा आधार कार्डची यांची सत्य प्रत स्थानिक रहिवासाचा पुरावा म्हणून अर्जासोबत जोडावी.तसेच पाणी/वीज/गॅस जोडण्याचे देयक (किमान एका वर्षाचे आतील) आधारकार्ड, राष्ट्रीयकृत/ शेडयुल्ड बँक/पोस्टाचे खाते पुस्तक, भारतीय पासपोर्ट महसूल विभागाचा जमिनीची मालकी असलेबाबतचा दस्तऐवज त्याबाबतचा (किसान वही धरुन) नोंदणीकृत भाडे करार (भाडयाने राहत असल्यास) नोंदणीकृत विक्री खत (स्वत:चे घर असल्यास) यापैकी एका दस्ताऐजवाची सत्यप्रत स्थानिक रहिवासाचा पुरावा म्हणून अर्जासोबत जोडावी. तरी धुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकांनी नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी आपली नाव नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल, उप जिल्हा निवडणूक अधिकारी अरविंद अतुर्लीकर यांनी केले आहे.



### मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रम

**आज रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध झाली आहेत, सोमवार १६ ऑक्टोंबर, २०२३ रोजी मतदार नोंदणी अधिनियमान्वये नोटिसीची प्रथम पुर्नप्रसिद्धी केली जाईल. बुधवार २५ ऑक्टोंबर, २०२३ रोजी द्वितीय नोटीस पुर्नप्रसिद्धी केली जाईल. नमुना १९ द्वारे दावे व हरकती स्वीकारण्याचा अंतिम दिनांक सोमवार ६ नोव्हेंबर, २०२३ असेल. त्यानंतर सोमवार २० नोव्हेंबरला हस्तलिखिते तयार करून प्रारुप मतदार याद्यांची छपाई केली जाईल. या प्रारुप मतदार याद्या गुरुवार २३ नोव्हेंबरला प्रसिद्ध होतील. त्यावर २३ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२३ पर्यंत दावे आणि हरकती स्वीकारले जातील. त्यानंतर २५ डिसेंबरपर्यंत दावे आणि हरकती निकाली काढून यादीची छपाई केली जाईल आणि शनिवार ३० डिसेंबरला अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल, असे जिल्हाधिकारी श्री.गोयल यांनी सांगितले.**



# साक्री शहरात एक तास एक साथ हे स्वच्छता अभियान संपन्न

**साक्री । प्रतिनिधी**

एक तास एक साथ या स्वच्छता अभियाना अंतर्गत व भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनास प्रतिसाद म्हणून साक्री नगरपंचायत तर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेची सुरुवात स्वच्छता कर्मचाऱ्यांसह सर्व नगरसेवकांनी नगरपंचायत कार्यालयापासून करण्यात आली.

यावेळेस नगराध्यक्ष जयश्री पवार, उपनगराध्यक्ष तथा गटनेते बापूसाहेब गीते, मुख्य अधिकारी दीपक पाटील, आरोग्य व स्वच्छता समिती सभापती मनीषा महेंद्र देसले, पाणीपुरवठा सभापती रेखा आबासाहेब सोनवणे, महिला व बालकल्याण सभापती जयश्री विनोद पगारिया, नगरसेवक दीपक वाघ, प्रवीण निकुंभ, पंकज मराठे, दयानंद मराठे यासोबत भारतीय जनता पक्षाचे उपजिल्हाध्यक्ष विजय भोसले, आबा सोनवणे, महेंद्र देसले, विनोद पगारिया, स्वप्निल भावसार, सेवा फाउंडेशन पुण्याचे वरून कुमार नगरपंचायतचे कर्मचारी दीपक पाटील, स्वच्छता ठेकेदार पंडित आधी उपस्थित होते नगरसेवकांनी व तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांनी साक्री शहरातील रस्ते स्वच्छ करून एक आदर्श निर्माण केला तसेच स्वच्छता पाळण्याचे आवाहन यावेळेस नगरपंचायत तर्फे करण्यात आले.

# निशाणे येथे स्वच्छता मोहिमेचे आयोजन

**चिमठाणे । प्रतिनिधी**



निशाणे येथे दोन महात्मा गांधी जयंती निमित्ताने तीन दिवसीय ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत निशाणे ग्राम पंचायत द्वारा स्वच्छता अभियान राबवण्यात आले. गावात अभियान राबवण्यात आले. स्वच्छता मोहिमेत सरपंच प्रमिला भिका पाटील, उपसरपंच राजेंद्र शिवसिंग गिरासे तसेच ग्रामपंचायत सदस्य विलास सखाराम सूर्यवंशी, ग्रामसेवक व गावातील जेष्ठ नागरिक व इतर ग्रामस्थ देखील या ग्राम स्वच्छता मोहिमेत उपस्थित होते.

# सारंगखेडा पुलाची आमदार रावलांकडून पाहणी

## १५ दिवसांत रहदारी सुरू करण्याच्या सूचना

**सारंगखेडा । प्रतिनिधी**

तालुका शहादा येथील तापी नदीवरील पुलाच्या ठिकाणी माजी मंत्री तथा आमदार जयकुमार रावल यांनी भेट देऊन पाहणी करून अधिकाऱ्यांना १५ दिवसांच्या आत पुलावरून लहान वाहनांची वाहतूक सुरू करावी, अशा सूचना दिल्या.

गेल्या आठवड्यात १७ सप्टेंबर रोजी तापी नदीच्या पात्रात हतनूर धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याच्या विसर्ग करण्यात आला. शिवाय परिसरात जोरदार पाऊस झाल्याने तापी नदीला महापूर आला होता. त्यात या पुलाचा भराव वाहून मोठे भगदाड पडल्याने प्रशासनाने पुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद केली आहे. त्यामुळे सर्वांना दोंडाईचा अथवा धुळ्याकडे जाताना शिरपूर व नंदुरबार मार्गे फिरून जावे लागत आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधींनी भेट देऊन अद्याप पुलाची पाहणी केली नव्हती. त्यामुळे जनतेत कमालीचा रोष होता. या भेटीमुळे मात्र समाधान व्यक्त झाले. आ.रावलांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दुरुस्तीबाबत अधिक माहिती घेतली. दुरुस्तीच्या कामाच्या दर्जा चांगला असावा. वारंवार नुकसान होता कामा नये. शहादा-दोंडाईचा परिसरातील जनतेचे अतोनात नुकसान होत आहे.

# मेरी माटी मेरा देश अभियान अंतर्गत विभागामार्फत वृक्षारोपण

**शिरपूर ।** श्रीमती एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालयात मेरी माटी मेरा देश अभियान अंतर्गत एन.एस.एस. विभागामार्फत वृक्षारोपण करण्यात आले. प्राचार्य डॉ.शारदा शितोळे, उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थिनी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# भारतीय जनता पार्टी पिंपळनेरतर्फे स्वच्छता अभियान

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

येथे महात्मा गांधी जयंती निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छता हीच सेवा अंतर्गत दि १ ऑक्टोबर रोजी भारतीय जनता पार्टी पिंपळनेर तर्फे बाबा चौक (बाबा सर्कल ग्रुप) येथे स्वच्छता अभियान साक्री विधान सभा प्रभारी इंजि मोहन सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप कोठावदे, जिल्हा कार्यकारणी सदस्य मोतीलाल पोतदार, शहराध्यक्ष नितीन कोतकर, प स सदस्य देवेंद्र गांगुर्डे, शाम पगारे, जिल्हा अध्यक्षा महिला आघाडी सविता पगारे, इंजि सेल जिल्हा अध्यक्ष विजय नंदन, मंडळ चिटणीस शेखर बाविस्कर, सरचिटणीस अनिल जाधव, रवींद्र कोतकर, डॉ राजेंद्र पगारे, हेमराज दसपुते, डी डी महाले, शहराध्यक्षा महिला आघाडी छाया वाडेकर, युवा मोर्चा शहर अध्यक्ष रामकृष्ण सोनवणे, योगेश कोठावदे, भूषण भदाणे, इंजि निखिल सूर्यवंशी, भूषण कोठावदे, भिला मिस्तरी, भटू पवार, डॉ अमित पाटील, सुभाष नेरकर, पप्पू पवार, नाना कोळी, गौतम पवार, विकास ढोले, प्रदीप चव्हाण, व बाबा फ्रेंड,चे सर्व सदस्य व भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते,मोठया संख्येने उपस्थित होते.

# निकुंभे व शिरडाणेला शैक्षणिक उपक्रम संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व्हावी आणि गोरगरीब विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहात यावेत यासाठी धुळे तालुक्यातील निकुंभे आणि शिरडाणे प्र.डा.येथे वह्या,पेनचे वाटप करण्यात आले तर वृक्षारोपण करुन वाढदिवसाला पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हयात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. निकुंभे ता.धुळे येथील युवक काँग्रेसचे एकनाथ वाघ यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना वह्या वाटप व वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. राजमाता अहिल्यादेवी होळकर माध्य. विद्यालय निकुंभे येथील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले.शाळेच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.याप्रसंगी कृषीभूषण भिका तात्या पाटील, ज्येष्ठ नेते मका जिभाऊ पाटील, माजी उपसरपंच रामभाऊ पाटील, सरपंच दादाभाई पाटील,माजी सरपंच सुनिलभाऊ गिरासे, गुड्डू गिरासे, एकनाथ पाटील, युवराज वाघ,सुभाष पाटील,पन्नालाल पाटील, दिलीप पाटील, आनंदा पाटील, राजेंद्र पाटील,किशोर पाटील, कमलाकर पाटील, जगन पाटील,रमेश पाटील आदी उपस्थित होते. तसेच शिरडाणे प्र.डा.येथे जनता उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक तुषार पाटील सर यांच्याकडून जि.प.मराठी शाळा शिरडाणे प्र.डा. ता.धुळे येथे विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप झाले.

या कार्यक्रमाला माजी सरपंच वसंत पाटील,अमृत पाटील, विष्णू पाटील,चेअरमन धोंडू पाटील,युवक काँग्रेसचे संदिप पाटील,मधुकर पाटील, वाल्मिक पाटील, शांतीलाल पाटील, विठ्ठल पाटील, सुरेश पाटील, अशोक पाटील, सतिष पाटील,प्रदिप पाटील, अरविंद पाटील आदी उपस्थित होते.

# सोशल मीडियाचा वापर जपून करा : धनगर

**चिमठाणे । प्रतिनिधी**

शिंदखेडा व राष्ट्रीय छात्र सेना शिंदखेडा युनिट यांच्या विद्यमाने आयोजित सोशल मीडिया आणि सायबर क्राईम या सामाजिक ज्वलंत विषयावर मार्गदर्शन पार पडले यावेळी प्रमुख वक्ते कायदा अभ्यासक धनंजय धनगर यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले.



आजचा युवा सोशल मिडीयाच्या या मायाजाळ मध्ये कश्या प्रकारे अडकत आहे. युवकांचा जास्तीत जास्त वेळ सोशल मीडिया मध्ये कश्या प्रकारे जात आहे. व प्रत्येक व्यक्ती समाजापासून कश्या प्रकारे दूर जात आहे. व नवनवीन शोधापासून या इंटरनेट च्या काळात कश्या प्रकारे या पिढीतील लोकांच्या मानसिकते वर कश्या प्रकारे परिणाम होत आहे असं सांगितले. यावेळी सोशल मीडियामुळे होणारे मानसिक ताण तणाव यांच्या बाबतीत देखील मार्गदर्शन केले. सोशल मीडियाच्या दुनियेतून बाहेर पडायला तयार नाहीत. त्यांनी सांगितले की सवय त्याच गोष्टींची होते हाताळणे सोपे असते तसेच सोशल मीडिया देखील मोबाईल हाताळणे हे सहज सोपे पद्धतीने हाताळू शकतो म्हणून सोशल मीडिया ची सवय लवकर लागते त्यांनी असेही सांगितले.

# बोराडी येथे शेतकरी सहाय्यता उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**शिरपूर । प्रतिनिधी**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व एच. आर. पटेल औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच न्यू बोराडी येथील विश्व मानव रुहानी केंद्र शाखा येथे शेतकरी सहायता उपक्रम राबविण्यात आला.




या शेतकरी सहाय्यता उपक्रमात कृषी क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. डॉ. आशुतोष पाटील उपस्थित होते. एच. आर. पटेल औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी देखील शेतकऱ्यांना संबोधित केले. त्यात त्यांनी आरोग्यावर परिणाम करणारी काही सेंद्रिय शेती पिके आणि भाजीपाला, कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे महत्त्व उपस्थित शेतकऱ्यांना पटवून दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेतकरी सहाय्यता उपक्रमाचे समन्वयक डॉ. राकेश मुथा यांनी सादर केले. या शेतकरी सहायता उपक्रमाचे मुख्य वक्ते कृषीभूषण प्रकाश पाटील यांनी शेतकऱ्यांना पिक विमा या योजनेविषयी जागृत केले. पिक विमा या योजनेविषयी असणाऱ्या तक्रारी शासनापर्यंत कशा पोहोचाव्यात याबाबत देखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर जिल्हा कृषि केंद्र, धुळे येथील शास्त्रज्ञ पंकज पाटील यांनी शेतकऱ्यांना माती संवर्धन कसे करावे व शेती करत असताना रासायनिक खतांचा उपयोग न करता सेंद्रिय खतांचा वापर करावा याबद्दल मार्गदर्शन दिले. जिल्हा कृषि केंद्र, धुळे येथील शास्त्रज्ञ धनराज चौधरी यांनी शेतकऱ्यांना शेती या व्यवसायाबरोबरच पूरक व्यवसाय करून उत्पन्न कसे वाढवता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे डॉ. श्वेता बेलगमवर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना संतुलित आहाराचे महत्त्व समजावले. धीरज देशमुख व रेहान पावरा यांनी परसबाग या संकल्पनेविषयी उपस्थित शेतकऱ्यांना जागृत केले व परसबागेचे प्रात्यक्षिक देखील करून दाखवले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तदनंतर आभार शेतकऱ्यांच्या वतीने बोराडी येथील सामाजिक कार्यकर्ते रमण पावरा यांनी तर महाविद्यालयाच्या वतीने समन्वयक डॉ. राकेश मुथा यांनी मानले. शेतकरी सहाय्यता उपक्रमात शेतकऱ्यांसाठी नाष्टा व जेवणाची व्यवस्था देखील करण्यात आली होती. या शेतकरी सहायता उपक्रमास न्यू बोराडी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली. जयवंत पाडवी, राजेंद्र पाटील, जगन पावरा, नारसिंग पावरा, विशाल पावरा, विश्वास पावरा, कुमारसिंग पावरा, श्रावण पावरा उपस्थित होते. शेतकरी सहायता उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा. केतन पाटील, हिम्मत पवार, मगण पावरा व एन. एस. एस. च्या विद्यार्थी, विद्यार्थिनी प्रतिनिधींचे सहकार्य लाभले.

# मालपूर येथे वीज पडून पाच शेळ्या ठार

**मालपूर ।** मालपूर (शिदखेडा) येथे किशोर हासरत अडगाळे यांच्या मालकीच्या पाच शेळ्या, चार कोंबड्या वीज पडून ठार झाल्या. दोन शेळ्या जखमी झाल्या आहेत. मालपूर (ता. शिदखेडा) परिसरात जोरदार वादळी वारा, विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटात पावसाने दमदार हजेरी लावली. तेव्हा वीज पडून शेतातील शेळ्या, कोंबड्या ठार झाल्या. सकाळी हा प्रकार लक्षात आल्यावर पाच शेळ्या ठार झाल्याचे आढळले. दोन जखमी झाल्या आहेत.

## घर विकणे आहे

चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयींनीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे

: संपर्क :

Mo. 81779 29477

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

सोमवार, दि. २ ऑक्टोबर २०२३





# स्वच्छता आपल्या आयुष्यात समृद्धी आणते: खा. डॉ.भामरे

## एक तास स्वच्छता मोहिम संपन्न





















धुळे । स्वच्छ भारत
अभियानातंर्गत तसेच महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून आज धुळे शहर आणि ग्रामीण भागात एक तारीख, एक तास स्वच्छता मोहिम संपन्न झाली. या स्वच्छता मोहिमेचा आज पांझरा नदी परिसरात सांगता समारोप संपन्न झाला. यावेळी खासदार डॉ.सुभाष भामरे, महापौर प्रतिभाताई चौधरी, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, महापालिका आयुक्ता अमिता दगडे-पाटील, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त विजय सनेर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, जयश्री अहिरराव यांच्यासह नगरसेवक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी खासदार डॉ.भामरे म्हणाले की, २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती आहे आणि त्यांना खऱ्या अर्थाने आदरांजली व्यक्त करण्यासाठी आपण सर्वांनी आपला गाव, आपले शहर स्वच्छ ठेवले पाहिजे स्वच्छता आपल्या सर्वांच्या जीवनातील महत्वाची गोष्ट आहे. कोणतीही मोहिम, चळवळ यशस्वी करायची असेल तर त्यात जनतेचा सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

सोमवार, दि. २ ऑक्टोबर २०२३ ६

# धुळ्यात स्वच्छता मोहीम संपन्न

## श्रमदानातून विद्यार्थ्यांनी केला नदी परिसर स्वच्छ
























धुळे । धुळ्यात विद्यार्थ्यांनी एक तारीख एक तास मोहिमेअंतर्गत श्रमदानातून पांझरा नदीत स्वच्छता केली. एक तास मोहिमेअंतर्गत श्रमदानातून विद्यार्थ्यांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाद्वारे स्वच्छता ही सेवा सप्ताहाचा समारोप करण्यात आला. या मोहिमेतंर्गत आज संपूर्ण जिल्हाभरात प्रत्येक वार्ड, गाव, रस्ते येथे सर्व नागरिकांनी मोठया संख्येने आज ही मोहिम राबविली जात आहे. आपला परिसर आपले गाव, शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी फक्त शासनाची नसून ती प्रत्येक नागरिकांची आहे. ही स्वच्छता मोहिम अभियानापुरताच मर्यादीत न ठेवता यापुढेही प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करावा. दैनंदिन जीवनशैलीत पर्यावरणाचा -हास होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घ्यावी. प्लास्टिकचा वापर टाळावा, ओला कचरा व सुका कचऱ्याचे वर्गीकरण करावे, आपल्या सभोवलताच्या नैसर्गिक जलस्त्रोतांचा तळे, नद्या प्रदूषत होणार नाही याची काळजी घेवून प्रत्येक नागरिकाने कमीत कमी कचरा कसा उत्पन होईल याची काळजी घ्यावी. महापालिकेने सुध्दा कायम शहरी भागात परिसर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करावा. स्वच्छतेची चळवळ अधिक प्रभावीपणे लोकांमध्ये रुजविण्यासाठी प्रत्येक नगरसेवकांनी सुध्दा आपल्या वार्डामध्ये स्वच्छतेची चळवळ राबवण्यात आली.

संकलन : दिपक वाघ